कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२४-२५/२४८२
दि. ०५/०२/२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे आयोजित "प्रतिभा" हा शास्त्रीय गायन वादन व नृत्याचा कार्यक्रम गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ रोजी कला अकादमीच्या कृष्णकक्षात संपन्न झाला.

सर्वप्रथम कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. अरविंद खुटकर यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. त्यांच्या सोबत श्री. सुभाष फातर्पेकर व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. त्यानंतर श्री. अरविंद खुटकर यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल असे मागदर्शन केले. उद्‌घाटनाच्या कार्यक्रमानंतर कु. अथर्व गायक यांचे बासरी वादन झाले. त्यांनी मत्त तालामध्ये राग मधुवंती सादर केला व त्याला जोडून तिनतालात द्रुत गत वाजविली त्यांना श्री. भार्गवराम गर्दे यांची तबला साथ लाभली. त्यानंतर संवादिनी एकलवादनात कु. सुरज मळीक यांनी भिमपलास रागात विलंबित ख्याल व द्रुत बंदिश सादर केली त्यांना श्री. गितेश मांद्रेकर यांची तबला साथ लाभली. संवादिनी वादनानंतर कु. राज्ञी फळदेसाई हिचे शास्त्रीय गायन झाले तिने राग बिहाग मध्ये विलंबित एकतालात ख्याल गायन व द्रुत तिनतालातील बंदिश सादर केली त्यांना तबला साथ श्री. सुरज मोरजकर व संवादिनी साथ श्री. शुभम नाईक यांनी केली. तद्‌नंतर तबला सहवादनाचा कार्यक्रम झाला त्यामध्ये कु. सौरव केरकर, कु. कौस्तुभ च्यारी व कु. साहिल माजिक यांनी ताल तिनताल पेश केला त्याना नगमासाथ श्री. चारुदत्त गावस यांची लाभली. तबला वादनानंतर कथ्थक नृत्याचा कार्यक्रम झाला त्यात कु. उमा नाईक हिचे कथ्थक नृत्य झाले. त्यांना सौ. वरदा बेडेकर यांनी पढंतवर तर श्री. सुरज मोरजकर यांची तबलासाथ व श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथ लाभली व शेवटी कार्यक्रमाची सांगता कु. अनुश्री कोळी, कु. मुस्कान खानोलकर, कु. तृप्ती दळवी, कु. मिश्का बेग, कु. रश्मी नावेलकर व कु. स्वरांगी खानोलकर यांच्या भरतनाटयम्‌ नृत्याने झाली. त्यांना डॉ. सपना नाईक यांची नटवंगमची साथ तसेच श्री. चेथनमुर्ती डी. आर यांची मृदगंम्‌ साथ व डॉ. दिप्ता रुबसुंदरम्‌ यांची गायन साथ लाभली. या संगीत सभेला सर्व विद्यार्थी, पालक व रसिक श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. वरदा बेडेकर व कु. कन्या नाईक यांनी केले तर श्री. सचिन तेली यांनी सर्वांचे आभार मानले.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)